महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३२ वे | दिनांक : ०७/०५/२०२६ | वार : गुरुवार

## राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा कहर



**नागपूर :** नवापूर तालुक्यातील ढोंग परिसरात आज दुपारी निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. अचानक बदललेल्या हवामानामुळे जोरदार वादळी वारा, अवकाळी पाऊस आणि आलेल्या चक्रीवादळाने या भागाला अक्षरशः झोडपून काढले. या नैसर्गिक आपत्तीत घरांचे पत्रे उडाल्याने अनेक संसार उघड्यावर आले असून, शेती पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी विद्युत खांब कोलमडल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला आहे.

दुपारच्या सुमारास आलेल्या या वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, ढोंग गावातील अनेक कच्च्या घरांवरील छपरे आणि पत्रे कागदासारखे हवेत उडून गेले. अचानक ओढवलेल्या या संकटामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली. घरात पावसाचे पाणी शिरल्याने धान्य आणि कपड्यांचे नुकसान झाले असून, अनेक कुटुंबांना उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे.

वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतात उभी असलेली पिके आडवी झाली आहेत. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच संकटात असलेल्या बळीराजासमोर आता या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे संकट उभे राहिले आहे.

नवापूर तालुक्यात भर उन्हाळ्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा कडाका सोसणाऱ्या ग्रामस्थांना आज दुपारी अवकाळी पावसाने झोडपून काढले. तालुक्यातील ढोंग, सांगाळी, नवापाडा, पांगरण आणि शिर्वे या भागात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. अनेक ठिकाणी झाड उलमडून पडली आहे.

राजगड तालुक्याला जोडणाऱ्या वेल्हे-नसरापूर मुख्य मार्गावर जोरदार वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे अडवली गावच्या हद्दीत मोठे झाड कोसळले. या घटनेमुळे सुमारे अर्धा तास वाहतूक पूर्णपणे ठप्प होऊन प्रवाशांचे हाल झाले; मात्र अडवली गावचे माजी सरपंच मोहन काटकर यांनी तत्काळ पुढाकार घेत जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावरील झाड बाजूला केले. त्यांच्या या समयसूचकतेमुळे विस्कळीत झालेली वाहतूक पुन्हा पूर्वपदावर आली आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला.

भंडारा जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या अवकाळी पावसाने आणि वादळी वाऱ्याने बळीराजाच्या चिंतेत मोठी भर घातली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार सायंकाळच्या सुमारास आलेल्या या पावसामुळे रब्बी हंगामातील कापणीला आलेले धान पीक अनेक ठिकाणी जमीनदोस्त झाले असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. आधीच विविध अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर या अस्मानी संकटामुळे पुन्हा एकदा गंभीर परिस्थिती ओढवली आहे.

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील पाळधीसह अनेक गावांमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून, यामुळे वाढत्या उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, हा आनंद शेतकऱ्यांसाठी चिंतेचा ठरला असून, मका, ज्वारी यांसारख्या काढणीला आलेल्या पिकांसह फळबागांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, ज्यामुळे बळीराजा पुन्हा एकदा अस्मानी संकटात सापडला आहे.

## सरकारी नोकरीच्या हव्यासापोटी पत्नीनेच दिली पतीची सुपारी



**चंद्रपूर :** पती-पत्नीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना चंद्रपूर जिल्ह्यात उघडकीस आली आहे. अनुकंपा तत्त्वावर सरकारी नोकरी मिळवण्याच्या लोभापोटी एका पत्नीने आपल्या पतीची सुपारी देऊन हत्या घडवून आणली. या क्रूर हत्याकांडाचा छडा लावण्यात भद्रावती पोलिसांना यश आले असून, मुख्य सूत्रधार पत्नीसह चार आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी येथील रहिवासी असलेले रवींद्र कुलमेथे (४६) हे पेशाने शिक्षक होते. २ मे रोजी भद्रावती पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या घोडपेठ परिसरातील हनुमान मंदिराजवळ त्यांचा मृतदेह अत्यंत संशयास्पद स्थितीत आढळला होता. मृताच्या गळ्याला प्लास्टिकची पिशवी आणि दुपट्टा गुंडाळलेला असल्याने ही हत्या असल्याचे प्राथमिक दर्शनी स्पष्ट झाले होते. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत मोबाईल कॉल डिटेल्सच्या आधारे मृताची ओळख पटवली.

तपासादरम्यान पोलिसांना मृताची पत्नी दीपमाला कुलमेथे हिच्यावर संशय आला. तिची सखोल चौकशी केली असता, तिने हत्येची कबुली देत धक्कादायक वास्तव समोर आणले. दीपमालाने पोलिसांना सांगितले की, पतीकडून होणाऱ्या त्रासाला ती कंटाळली होती. नागपूर येथे उपचारासाठी गेली असता तिची ओळख वर्षा परचाके नावाच्या महिलेशी झाली. वर्षाने तिला पतीचा काटा काढण्याचा सल्ला दिला. त्यानंतर दीपमालाने वर्षा, प्रवीण कालोकर आणि नाझीर अंसारी यांच्या मदतीने १ लाख रुपयांची सुपारी देऊन पतीच्या हत्येचा कट रचला.

२९ एप्रिल रोजी दीपमालाने पती रवींद्र यांना दिघोरी येथे एका नातेवाईकाच्या लग्नासाठी बोलावून घेतले. दुसऱ्या दिवशी आरोपी सोनू कालोकर आणि नाझीर अंसारी कार घेऊन तिथे पोहोचले. दीपमालाने पतीला आरोपींच्या स्वाधीन केले. आरोपींनी रवींद्र यांना घोडपेठ येथील निर्जन स्थळी नेले आणि कारमध्येच गळा आवळून त्यांची निर्घृण हत्या केली.

हे पती-पत्नी गेल्या अनेक वर्षांपासून विभक्त राहत होते. मात्र, पती शिक्षक असल्याने त्यांच्या निधनानंतर आपल्याला 'अनुकंपा' तत्त्वावर सरकारी नोकरी मिळेल, या स्वार्थापोटी पत्नीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. केवळ सरकारी नोकरी आणि पैशांच्या हव्यासापोटी एका महिलेने आपल्याच पतीचे कुंकू पुसल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

## अभियांत्रिकी पदवीधरांना आता एम.एस्सी.ला प्रवेश : नागपूर विद्यापीठाचा बहुविषयक शिक्षणात पुढाकार

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने २०२६-२७ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी पदवीधरांसाठी एक महत्त्वाचा शैक्षणिक उपक्रम सुरू केला आहे. या निर्णयानुसार, कोणत्याही शाखेतील बी.ई./बी.टेक. पदवीधरांना विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांतर्गत भौतिकशास्त्र, गणित, सांख्यिकी आणि अर्थशास्त्र या विषयांतील एम.एस्सी. पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेता येणार आहे.

सध्याच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सेमीकंडक्टर तंत्रज्ञान, प्रगत पदार्थ विज्ञान आणि अक्षय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये केवळ तांत्रिक कौशल्ये पुरेशी नाहीत. या क्षेत्रांमध्ये मूलभूत वैज्ञानिक तत्त्वांचे सखोल ज्ञान आणि विश्लेषणात्मक क्षमता असणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना अनुप्रयुक्त ज्ञानाचा मजबूत पाया मिळतो, परंतु भौतिकशास्त्र, गणित आणि सांख्यिकी यांसारख्या मूलभूत विषयांतील सखोल अभ्यास त्यांना संशोधन, नवोन्मेष आणि उच्चस्तरीय समस्या सोडवण्याकडे घेऊन जातो.

या नवीन अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना क्वांटम मेकॅनिक्स, नॅनोतंत्रज्ञान, डेटा ॲनालिटिक्स, मशीन लर्निंग, ऑपरेशन्स रिसर्च, वित्तीय गणित आणि बायोस्टॅटिस्टिक्स यांसारख्या आधुनिक विषयांचा अभ्यास करता येईल. यामुळे अर्थसंवाहक उद्योग, डेटा सायन्स, बँकिंग, विमा, संशोधन संस्था, अध्यापन तसेच पीएच.डी. सारख्या उच्च शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतील.

२०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, पात्र अभियांत्रिकी पदवीधरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ नवीन करिअर मार्गच उघडणार नाही, तर भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक बहुआयामी दृष्टीकोनही प्रदान करेल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०७ जुन २०२६


## धर्मवीर संभाजी विद्यालयात महर्षी पतंजली योग प्राणायाम शिबिराची उत्साहात सांगता



**छत्रपती संभाजीनगरा :** धर्मवीर संभाजी विद्यालयात मागील चार दिवसापासून सुरू असलेल्या महर्षी पतंजली योग प्राणायाम शिबिराची सांगता राज्यस्थान राज्याचे महामहीम राज्यपाल श्री हरिभाऊजी बागडे नाना यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.२०१० पासून सुरू असलेल्या सुट्ट्यातील योग प्राणायाम शिबिराचे हे सतरावे वर्ष आहे या शिबिरातील शेवटचे पुष्प संस्थेचे अध्यक्ष श्री हरिभाऊ बागडे नाना, यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. श्रीमती सुशीला बन्सवाल व कल्याणी कुलकर्णी- विटेकर या तज्ञ शिक्षकांकडून योग मार्गदर्शन झाले यावेळी बोलताना सुखी निरामय व यशस्वी जीवन जगण्यासाठी योगमय जीवन व नित्य योग साधना काळाची गरज झाली आहे असे प्रतिपादन हरिभाऊ बागडे नाना यांनी केले, या शिबिरासाठी योग प्राणायाम समिती, भारतीय योग संस्थान, योग विद्या धाम नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा मुक्त विद्यापीठ, त्यांच्या संयुक्त विद्यमानाने सुरू असलेल्या या शिबिरासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी योग प्रेमी सर्व साधकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल संस्थेचे सचिव निवृत्ती पाटील गावंडे ज्येष्ठ संचालक डॉ. सर्जेराव ठोंबरे सर संचालक विवेकजी हंबर्डे,तथा योग प्राणायाम शिबिर प्रमुख श्री रमेश डकले सर उपस्थित होते .असे प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनात श्री बळीराम मुरमे यांनी कळवले आहे.

## आरोग्य मित्र श्री शिवाजी सौदर पाटील यांना सेवा गौरव पुरस्कार प्रदान




**छत्रपती संभाजीनगर :** हेल्थकेअर असोसिएशन महाराष्ट्र यांच्यावतीने श्री शिवाजी सौदर पाटील यांना सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. हेल्थकेअर असोसिएशन महाराष्ट्र चे उपाध्यक्ष श्री.जितेंद्र धापसे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.यावेळी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष धनंजय कणसे, अध्यक्ष सुजाता नाईक, उपाध्यक्ष जितेंद्र धापसे, डॉक्टर अजय दंडे संचालक दंडे हॉस्पिटल, डॉक्टर निखिल चव्हाण एकविरा हॉस्पिटल, डॉक्टर तेजिंदर छाबडा, डॉक्टर मानधने इन्फिनिटी हॉस्पिटल, डॉक्टर धनश्री चलवदे मातृका वुमन्स हॉस्पिटल, यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. दोन दशकांच्या अतुलनीय, संवेदनशील, आणि निस्वार्थ सर्मपित सेवेबद्दल कृतज्ञतापूर्वक हा पुरस्कार श्री शिवाजी सौदर पाटील यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयदीप रणसिंग यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री कैलास काळे यांनी केले. यावेळी डॉक्टर गणेश कुलकर्णी आणि डॉक्टर अजय दंडे यांनी उपस्थित आरोग्य मित्रांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय कणसे यांनी संस्थेच्या आगामी ध्येय धोरण बाबत आरोग्य मित्रांना माहिती दिली.गौरव समारंभ यावेळी उपस्थित आरोग्यमित्रांचा त्यांच्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. यात श्री परमेश्वर केकान, साहेबराव सांगळे, नंदकिशोर तांगडे, विनोद कगले, महेश गुजर, जयदीप रणशिंग, सुधाकर कोर्तक, रवी लांडगे, संदीप कसबेकर, कृष्णा नळकांडे, संदीप कनाके, संतोष सूर्यवंशी, आदि उपस्थित होते.

## शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी अखेर शिक्षकांना दिला न्याय




**छत्रपती संभाजीनगर :** मोरेश्वर शिक्षण संस्था संचलित शांतीई प्राथमिक विद्यालय बजाज नगर छत्रपती संभाजी नगर या शाळेतील सहशिक्षक श्री रावसाहेब बोरसे श्री अजित जाधव श्री सागर सूर्यवंशी श्री रामेश्वर गोराडे, श्री रवींद्र मगर श्री सचिन मुसळे आणि संभाजी जाधव गेल्या दोन दिवसापासून जिल्हा परिषद प्राथमिक छत्रपती संभाजीनगर येथे आमरण उपोषणास बसलेले होते त्यांच्या सर्व न्याय हक्क मागण्या शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण व कार्यालयीन अधीक्षक प्रदीप राठोड यांनी सर्व मागण्या मान्य असल्याचे पत्र देऊन उपोषण करता शिक्षकांना लिंबू पाणी देऊन हे उपोषण अखेर सोडविले. हे मराठवाडा शिक्षक संघाच्या भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण राबविण्यात आले होते.शाळेतील मुख्याध्यापकांनी नियमबाह्यरीत्या तुकडी वर्गाचा वाढीव टप्पा पगार मूळ वर्गाला दिलेला आहे. तो वाढीव टप्पा शासन निर्णयानुसार तुकडी वर्गांच्या शिक्षकांच्या पगारी खात्यावर जमा करण्यात यावा.सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत अद्यावत करून तात्काळ शिक्षकांना देण्यात यावी. शाळेतील ज्या शिक्षकांनी बारा वर्षाचा कालावधी पूर्ण केलेला आहे व वरिष्ठ वेतन श्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे अशा शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. शाळेत रुजू करून घेत असताना शाळेतील मुख्याध्यापक, संस्था सचिव व अध्यक्षा यांनी सर्व कर्मचाऱ्यांकडून दहा कोऱ्या कागदांवर स्वाक्षरी करून घेतलेल्या आहेत. तसेच शाळेतील सर्व शिक्षकांना धमकावून स्वाक्षरी सह राजीनामा व काही आक्षेपार्ह मुद्दे लिहून घेऊन त्यावर दिनांक नसलेले 15 कागदपत्रे तात्काळ देण्यात यावेत. शाळेतील मूळ वर्गावरील शिक्षक व तुकडी वर्गावरील शिक्षक यांना समान कामे वाटप करण्यात यावी. या प्रमुख मागणीसाठी उपोषण होते. डॉ उमाकांत राठोड, नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, कृष्णा गोंडे, बाळू पवार, शैलेश पाटील, विलास चव्हाण, डॉ. पद्माकर पगार, मनोज चव्हाण, सोनाली गव्हाणे, स्वाती बोंडे, रेखा साकळे, अरुणा चौधरी, सविता हिंगे, शितल कवडे संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या आमरण उपोषणाला पाठिंबा दिला होता.

## डॉ. बाळासाहेब लिहिणार

नास्तिक आहे मी,
आंधळा विश्वास माझ्या स्वभावात नाही,
प्रश्न विचारणं हीच माझी प्रार्थना,
आणि उत्तर शोधणं हीच माझी साधना ...

नास्तिक आहे मी
देवाच्या नावावर भीती नाही,
पाप-पुण्याच्या मोजमापात अडकत नाही,
चांगुलपणा करायला
स्वर्गाच्या लालसेची गरज नाही...

नास्तिक आहे मी,
माझा धर्म एकच—माणुसकी,
ना तंत्र, ना मंत्र,
माझी ओळख फक्त प्रामाणिकपणाची...
जेव्हा कुणी रडतं,
तिथे माझं मंदिर उभं राहतं,
जेव्हा कुणी हसतं,
तिथे माझं देवत्व फुलतं...
मी प्रश्न विचारतो, म्हणून जिवंत आहे,
मी सत्य शोधतो, म्हणून मुक्त आहे....

नास्तिक आहे मी—
विचारांमध्येच माझा देव दडलेला...
ना भीती, ना बंधन,
ना स्वर्गाची लालसा, ना नरकाची छाया,
माझ्या कर्मांमध्येच माझं जग...

नास्तिक आहे मी,
अंधारातही प्रकाश शोधतो,
पण माणूसपण कधी हरवू देत नाही...

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०७ जुन २०२६


## अद्दल

बिळातला एक उंदीरमामा
खेळायचा आमच्या घरात
कुणी दिसले की
पळायचा जोरात

गोड पदार्थ खाण्याची
होती त्याला हाव
लाडूचा डबा उघडून
मारायचा मस्त ताव

रोज रोज खायचा
टोपल्यातली पोळी
येतांना आणायचा
पिल्लांची टोळी

खटपटी उंदीरमामाचा
वैताग यायचा फार
पिंजऱ्यात कोंडतांना
आमचीच व्हायची हार

एकदा स्वयंपाक घरात
भजी तळू लागली आई
भुकेल्या उंदीरमामाला
खायची झाली घाई

ईकडे तिकडे पाहून
त्याने भज्याला लावले तोंड
तोंड भाजताच म्हणाला
काय आली ही धोंड?

चूं चूं करीत उंदीरमामा
बिळात गेला पळून
भली अद्दल घडली
चुकले त्याला कळून




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


# मराठवाडा शिक्षक संघाच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण सुरू




**छत्रपती संभाजीनगर :** मुर्डेश्वर शिक्षण संस्था संचालित शांताई प्राथमिक विद्यालय या शाळेतील शिक्षकांची संस्थाचालक आणि मुख्याध्यापकांकडून शिक्षकांची आर्थिक पिळवणूक आणि शासनाची आर्थिक लूट होत असल्याने याच शाळेतील सहशिक्षक श्री रावसाहेब तुकाराम बोरसे, श्री रवींद्र दामोदर मगर, श्री रामेश्वर देविदास गोराडे, श्री अजित शेषराव जाधव, श्री सागर संजीव सूर्यवंशी, श्री संभाजी हनुमंता जाधव, श्री सचिन नारायण मुसळे हे मराठवाडा शिक्षक संघाच्या भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक ०५ मे २०२६ वार मंगळवार रोजी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी प्राथमिक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक संदिप लक्ष्मण काजळे हे आहेत. संस्था सचिव लक्ष्मण ओंकार काजळे व अध्यक्षा श्रीमती संगीता लक्ष्मण काजळे हे शासनाची आर्थिक लूट व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याविषयी खेळत आहेत यात प्रशासन देखील यांना मदतच करीत आहेत, असा आरोप मराठवाडा शिक्षक संघाने केलेला आहे शाळेतील मुख्याध्यापकांनी नियमबाह्यरीत्या तुकडी वर्गाचा वाढीव टप्पा पगार मूळ वर्गाला दिलेला आहे. तो वाढीव टप्पा शासन निर्णयानुसार तुकडी वर्गांच्या शिक्षकांच्या पगारी खात्यावर जमा करण्यात यावा.सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत अद्यावत करून तात्काळ शिक्षकांना देण्यात यावी. शाळेतील ज्या शिक्षकांनी बारा वर्षाचा कालावधी पूर्ण केलेला आहे व वरिष्ठ वेतन श्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे अशा शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. शाळेत रुजू करून घेत असताना शाळेतील मुख्याध्यापक, संस्था सचिव व अध्यक्षा यांनी सर्व कर्मचाऱ्यांकडून दहा कोऱ्या कागदांवर स्वाक्षरी करून घेतलेल्या आहेत. तसेच शाळेतील सर्व शिक्षकांना धमकावून स्वाक्षरी सह राजीनामा व काही आक्षेपार्ह मुद्दे लिहून घेऊन त्यावर दिनांक नसलेले १५ कागदपत्रे तात्काळ देण्यात यावेत. शाळेतील मूळ वर्गावरील शिक्षक व तुकडी वर्गावरील शिक्षक यांना समान कामे वाटप करण्यात यावी. या प्रमुख मागणीसाठी मराठवाडा शिक्षक संघाचे महानगर सचिव नवनाथ मंत्री अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, कृष्णा गोंडे, बाळू पवार, विलास चव्हाण, डॉ. पद्माकर पगार, सोनाली गव्हाणे, स्वाती बोंडे, रेखा साकळे, अरुणा चौधरी, सविता हिंगे, शितल कवडे संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या आमरण उपोषणाला पाठिंबा दिला आहे.






# ए.ई.डी.पी च्या विद्यार्थ्यांनी अप्रेंटिसशिपद्वारे आपले भविष्य घडवावे : सहाय्यक संचालक निखिल गांगडे



**छत्रपती संभाजीनगर :** मौलाना आझाद कॉलेज, रोझा बाग आणि बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग यांच्यामध्ये बीए सायकॉलॉजी आणि बीएससी इंडस्ट्रियल केमिस्ट्रीच्या विद्यार्थ्यांसाठी अप्रेंटिसशिप ट्रेनिंग संदर्भात सामंजस्य करार (MOU) बोर्ड करण्यात आला. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मझहर फारुकी आणि ऑफ अप्रेंटिसशिपचे सहाय्यक संचालक निखिल गांगडे उपस्थित होते.कार्यक्रमात उद्योग क्षेत्राकडून डॉ. फुरकान दिवान, सिनियर सायंटिस्ट वखाड लिमिटेड, सतीश वानखेडे, प्रो. क्रोम्स ॲनालिटिकल इन्स्टिट्यूट तसेच सायकॉलॉजी विभागाकडून डॉ. फैसल खलजी, सना खलजी, शुभम डोंगरे (हेडगेवार हॉस्पिटल), शेख एजाज सिद्दीकी, डॉ. झैनब खान आणि हुजैफा खान उपस्थित होते. याशिवाय AEDP कोर्सेस करणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि महाविद्यालयाचा अध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाची सुरुवात मौलाना वकार यांच्या कुरआन पठणाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे पुस्तक भेट देऊन स्वागत करण्यात आले.प्रास्ताविक भाषणात प्राचार्य डॉ. मझहर फारुकी यांनी कार्यक्रमाचे उद्देश स्पष्ट केले. त्यांनी अप्रेंटिसशिप बोर्डाच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांना होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला तसेच नवीन शैक्षणिक धोरण (NEP) आणि UGC च्या मार्गदर्शक सूचनांनुसार या कोर्सेसचे महत्त्व अधोरेखित केले.डॉ. अझहर पटेल यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. यावेळी सहाय्यक संचालक निखिल गांगडे यांनी अप्रेंटिसशिपसाठी पात्रता, त्याचे फायदे आणि अंतिम वर्षात विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या आर्थिक सहाय्याबाबत (स्टायपेंड) सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सध्याच्या काळात उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी अशा प्रकारच्या कोर्सेसद्वारे भरून काढता येऊ शकते. तसेच भारत सरकारने उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक विद्यापीठाला AEDP कोर्सेस सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान प्रश्नोत्तरांचे विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले. कार्यशाळेत सुमारे वीस विविध उद्योगांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते, तर AEDP कोर्सेसमध्ये प्रवेश घेतलेल्या सुमारे २० विद्यार्थी-विद्यार्थिनी देखील उपस्थित होत्या.शेवटी IQAC समन्वयक प्राध्यापक जे. डी. शेख यांनी आभार प्रदर्शन केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समरीन फारुकी यांनी केले.